**रे. मु. नं. ६१/२०२४**
**सुनिल वि. शाम**
**निशाणी २० खाली**

**<u>वादी पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ सुनिल रामदास खांडेकर याची उर्वरित सरतपासणी शपथेवर सुरू</u> — <u>वादीतर्फे विधिज्ञ श्री. एस. जी. कुळकर्णी यांच्यामार्फत</u> —**

प्रस्तुत प्रकरणी दाव्याच्या अनुषंगाने मी माझे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र निशाणी २० वर दाखल केले असुन त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. प्रस्तुत प्रकरणी मी अभिलेखावर दस्त यादी निशाणी ३ सोबत मौजे अकोली जहॉगीर येथील गट क्र. १३१ च्या ७/१२ उता—याची प्रमाणीत प्रत दाखल केली आहे. त्यास **निशाणी २१** देण्यात येते. मी प्रतिवादींना माझे वकिलांमार्फत नोटीस पाठवली होती. सदर नोटीसची स्थळप्रत मी अभिलेखावर दाखल केली आहे. सदर नोटीसच्या स्थळप्रतीस **निशाणी २२** देण्यात येते. निशाणी २२ वरिल नोटीस मी प्रतिवादींना पोस्टाने पाठवल्या होत्या. त्याबाबत पोस्टाच्या मुळ पावत्या मी अभिलेखावर दाखल केल्या आहेत. त्यांना अनुक्रमे **निशाणी २३ ते २५** देण्यात येते. निशाणी २२ वरिल नोटीस प्रतिवादी क्र. १ ते ३ यांना प्राप्त झाल्याबाबत पोस्टाच्या तीन मुळ पोहच पावत्या मी अभिलेखावर दाखल केल्या आहेत त्यांना अनुक्रमे **निशाणी २६ ते २८** देण्यात येते. **सरतपास पुर्ण.**

**उलटतपासणी — प्रतिवादीतर्फे तोंडी विनंतीवरून पुढील तारखेपावेतो तहकुब.**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत.

**स्वा/—**
(ए.ए. माळी)
२रे सह दिवाणी न्यायाधीश,
अकोट, जि. अकोला.

दि. २३.०२.२०२६
अकोट